# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in



२३ नोव्हेंबर, २०१९



☎ : 07172-264300

: 07172-255800

✍: 7276494810 (PRO)


# पोलीस विभागातर्फे वाद विवाद स्पर्धेचे आयोजन

चंद्रपुर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात पोलीस रायझींग डे निमित्य इयत्ता ११ आणि १२ मधील विद्यार्थ्यांकरीता (मुले, मुली) दिनांक २७/११/२०१९ रोजी वाद विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदची स्पर्धा ही पोलीस कन्व्हेंशन हॉल चंद्रपुर येथे आयोजीत करण्यात आली असुन स्पर्धेचा विषय हा **Social Changes Rather Than Stricter Lows is Required for a Safer Environment For Women** (समाजातील महिला सुरिक्षतते बाबत कठोर कायदे आवश्यक आहे की समाज परिर्वत आवश्यक) यावर आधारीत आहे. सदर स्पर्धा ही मराठी आणि इंग्रजी भाषेत घेण्यात येणार असुन स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे तर्फे प्रशस्तीपत्र आणि प्रथम व द्वितीय विजेत्यांना सम्मान चिन्ह देण्यात येईल.

जिल्हा स्तरावर निवड झालेल्या टिमला परिक्षेत्रीय स्तरावर स्पर्धेकरीता नागुपर येथे पाठविण्यात येणार असुन तेथुन निवड झालेल्या टिमला राज्य स्तरीय स्पर्धेकरीता मुंबई येथे पाठविण्यात येईल. आणि राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या विजेत्या टिमला मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे तर्फे पोलीस महासंचालक कप, प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम १ लक्ष रू. तसेच द्वितीय येणाऱ्या टिमला प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम ५० हजार तसेच स्पर्धेतील प्रत्येक बाजुने बोलणाऱ्या प्रथम उत्कृष्ठ वक्त्यास कप, प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम १० हजार असे बक्षीस देण्यात येईल.

स्पर्धेमध्ये नावनोंदणीकरीता जिल्हयातील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, वरोरा, राजुरा, चंद्रपुर, मुल, चिमुर, गडचांदुर, ब्रम्हपुरी याठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. तरी पोलीस विभागातर्फे जिल्हयातील सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, आपण मोठया प्रमाणात नाव नोंदणी करून स्पर्धेत सहभागी व्हावे.

---